# क्रेडिट कार्ड असेल तर एसटीचे तिकीट मोबाईलवरून काढा!

मुंबई, गुरुवार – एसटीचे तिकीट आरक्षित करण्यासाठी प्रवाशांना तिकीट केंद्रावरील खिडकीसमोर रांगेत उभे राहण्याची गरज नाही. मोबाईलवरून एसएमएस करून तिकीट मिळविता येणार आहे. ही सुविधा परिवहनमंत्री राधाकृष्ण विखे–पाटील यांच्या हस्ते सुरू करण्यात आली आहे.

'ॲटम' नावाचा सॉफ्टवेअर एसटी महामंडळाने विकत घेतला असून 'ॲटम' सॉफ्टवेअरवर मोबाईलवरून नाव, पत्ता, एसटीच्या तिकिटासंबंधी माहिती टाईप केल्यास



तुमचे तिकीट आरक्षित होऊ शकते. मात्र तिकिटाकरिता क्रेडिट कार्डवरून पैसे भरायला हवेत. तीन मिनिटांत तिकीट आरक्षित करण्याचा विक्रम एसटीने केला आहे. एसटीच्या एकूण १६ हजार बस असून रोज ७० हजार प्रवासी प्रवास करतात. १ हजार नव्या लक्झरी बस खरेदी केल्या जाणार आहेत. मोबाईलवरून तिकीटसेवा देण्याचा विक्रम संपूर्ण भारतात कर्नाटकने पहिला केला होता. त्याच धर्तीवर महाराष्ट्रात ही सेवा लागू करण्यात आली आहे. दर तिकिटामागे १.८ टक्के अधिक रक्कम भरावी लागणार आहे. जीपीआरएस सिस्टीम असलेल्या मोबाईलवरून तिकीट आरक्षित करता येईल.